जा.क्र.प्राकृसंके/किशावि/११७/२०२२
प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र,
कर्जत ४१० २०१, जि. रायगड
दिनांक : 09/05/2022

10 MAY 2022

प्रति,

मा. संचालक विस्तार शिक्षण,
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
दापोली –४१५ ७१२, जि. रत्नागिरी.

**विषय** : जाहिरात प्रसिध्दी करणेबाबत...

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार आपणांस कळविण्यात येते की, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील किटकशास्त्र विभागात प्रयोगाची तसेच प्रयोगशाळेतील कामे ठेका पध्दतिने ठेकेदारांकडून करून घ्यावयाची असुन सदर जाहिरात आपल्या विद्यापीठाच्या वेबसाईट वर प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

**सोबत** : वरीलप्रमाणे.

आपला विश्वासु,

**सहयोगी संशोधन संचालक,**
प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र,
कर्जत, जि. रायगड.

# प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
# कर्जत–४१०२०१, जि. रायगड

जा.क्र.प्राकृसकें/किशावि/मजुर कंत्राटी कामे/ 998 / /२०२२, दि. 10 MAY 2022

## जाहिर प्रसिध्दी (NOTICE)

प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथिल किटकशास्त्र विभागाअंतर्गत प्रक्षेत्रावरील व प्रयोगशाळेतील कामे निव्वळ कंत्राटी पध्दतीने **खरीफ** हंगाम २०२२ या हंगामाकरीता (दि. 01/06/2022 ते दि. 30/11/2022) करावयाची आहेत. सदर काम करण्यास इच्छुक असणाऱ्या अनुभवी कंत्राटदारांनी सोबत जोडलेल्या कामासाठी आपले दरपत्रक या कार्यालयास दि. २४/०५/२०२२ सादर करावे. सोबत कामाच्या अटी व शर्ती आपल्या माहितीसाठी जोडण्यात आलेल्या आहेत.

सहयोगी संशोधन संचालक
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र
कर्जत–४१०२०१ जि. रायगड

**प्रत : प्रसिध्दीसाठी**

१. नोटीस बोर्ड, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत, जि. रायगड
२. डॉ. बा. सा. को. कृ. विद्यापीठ दापोली संकेतस्थळ
३. मा. कार्यकारी अधिकारी, पंचायत समिती/नगर परिषद कार्यालय, कर्जत, जि. रायगड यांना माहितीसाठी व योग्य प्रसिध्दीसाठी.
४. मा. तहसिलदार, तहसिल कार्यालय, कर्जत, जि. रायगड यांना माहितीसाठी व योग्य त्या प्रसिध्दीसाठी.
५. ग्रमपंचायत, हालीवली, किरवली यांना माहितीसाठी व योग्य प्रसिध्दीसाठी अग्रषित.

## प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील किटकशास्त्र विषयक ठेका पध्दतीने करावयाच्या कामाचे

## दरपत्रक

प्रति,

मा. सहयोगी संशोधन संचालक,
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत, जि. रायगड

**विषय:** किटकशास्त्र विभाग, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील किटकशास्त्र विभागामधील व प्रयोगशाळेतील कामे ठेका पध्दतीने करावयाच्या कामाचे दरपत्रक

**संदर्भ:** जा.क्र. प्राकृसकें/किटक/कं.म./ /२०२२, दिनांक :

आपल्या वरील संदर्भित पत्रान्वये किटकशास्त्र विभाग, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील किटकशास्त्र विभागामधील व प्रयोगशाळेतील विषयक कामे ठेका पध्दतीने करण्यासाठी कामाचे दरपत्रक खालील प्रमाणे आहे.

| कामाचा तपशिल | खरीफ हंगामासाठी<br>(दि. 01/06/2022 ते दि. 30/11/2022) |
|---|---|
| सोबतच्या यादीमध्ये नमुद केल्यानुसार किटकशास्त्र विभागामधील व प्रयोगशाळेतील कामे ठेका पध्दतीने करण्यासाठीचे दरपत्रक | रक्कम रुपये.............................. (रुपये ) मात्र |

मला सर्व अटी व शर्ती मान्य आहेत तरी माझे दरपत्रक मंजूर करावे ही विनंती.

सही : ..........................................

नांव : ..........................................

पत्ता : ..........................................

..........................................

..........................................

## ठेकाबाबतच्या सर्व साधारण अटी व शर्ती

1. प्रक्षेत्रावरील कामे संबधीत विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख विभागाच्या आवष्यकतेनुसार नेमून देतील त्याप्रमाणे करणे आवष्यक राहील.
2. कामाच्या देयकाची आदायगी महिना पुर्ण झाल्यावर केली जाईल. त्यासाठी देयक सादर करतेवेळी विभाग प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांचे काम वेळेत पुर्ण केल्याबाबतचा दाखला जोडणे आवष्यक आहे.
3. निविष्ठांचा पुरवठा या विभागामार्फत केला जाईल.
4. ठेकेदाराकडे स्वतःचे पॅन कार्ड व बॅंक खाते असणे आवष्यक आहे. तसेच ठेकेदाराने कामगारांना कामाचे वेतन व त्या अनुष्यंगीक रक्कम संबधीत कामगारांच्या बॅंक खाती जमा करणे आवष्यक आहे.
5. ठेकेदाराने नेमलेल्या मजुरांना शासनाच्या किमान वेतन दरानुसार किमान वेतन दिले जाते असे प्रमाणित करणे आवष्यक आहे.
6. प्रक्षेत्रावरील मालमत्तेचे कामगारांकडून नुकसान झाल्यास ठेकेदारास जबाबदार धरले जाईल.
7. ठेक्यामध्ये असलेल्या मजूरांव्यतिरिक्त प्रक्षेत्रावर गरजेनुसार जादा मजूर विहीत कार्यपध्दती अवलंबून नेमण्याचा अधिकार संबधित विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना राहील.
8. ठेक्यातील मजूरांची किमान व कमाल वयोमर्यादा शासन निर्णयानुसार निष्चीत केलेली असावी.
9. याचिका क. 1591/2018 संदर्भात मा. उच्च न्यायलय मुंबई यांच्या दिनांक 18 एप्रिल, 2018 च्या निर्णयानुसार अंतरिम स्थगितीस अनुसरून परिच्छेद क. 51 (ई) नुसार याचिकाकर्त्या मजूंरांना ठेकेदाराने ठेक्यामध्ये सामावून घेणे आवष्यक आहे.
10. ठेकेदारामार्फत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठ प्रषासनावर राहणार नाही.
11. ठेकेदार व्यक्तीस/संस्थेस उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.
12. ठेक्यासंबधी इतर सर्व अधिकार विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांना/विद्यापीठ प्रषासनाला राहतील.
13. वरील सर्व कामे करताना कामगारास कोणतीही ईजा, अपघात किंवा अन्य काही झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी ठेकेदाराची म्हणजेच माझी राहील.

(ठेकेदार)

**प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,**

**कृषि किटकशास्त्र विभाग**

**विभागाच्या विविध प्रयोगांची व प्रयोगशाळेतील करण्यात येणा–या कामांची यादी**

**कालावधी–माहे** . 01/06/2022 ते दि. 30/06/2022

1) प्रक्षेत्रावर विविध पिकांच्या पेरणीकरीता गादी वाफे तयार करणे.
2) सदर रंगविलेल्या लाकडी पट्यांवर अनुंक्रमाक टाकणे.
3) सदर पट्यांची प्रक्षेत्रावर वाहतुक करणे.
4) चाचणी प्रयोगांच्या विविध वाणांसाठी असणाऱ्या लाकडी पट्या साफ करून त्या रंगविणे.
5) खरीप हंगामातील [illegible] प्रयोगांची तसेच एजन्सी प्रयोगांची बियाणे खरीप हंगामाकरीता तयारी करणे.
6) गादी वाफ्यांवर उगवुन येणाऱ्या तणांची बेणणी करणे किंवा त्यावर तणनाषके फवारणे.
7) पेरणीच्या वेळी गादीवाफ्यामध्ये शेणखत टाकुन बुजवुन घेणे व पाणी व्यवस्थापन करणे.
8) गादीवाफ्यामध्ये बी रूजुन येईपर्यंत राखण करणे. खतांची मात्रा देणे.
9) विविध प्रयोगांच्या प्रक्षेत्रातील बांध साफसफाई करणे.
10) विविध प्रयोगांच्या प्रक्षेत्रातील बेणणी करणे.
11) लावणी करण्यासाठी प्रक्षेत्राची मषागत करणे.
12) AICRIP व एजन्सी ट्रायल प्रयोगाची लावणी करणे. लागवडीनंतर त्यांना दिषा दर्षक बोर्ड लावणे.
13) प्रक्षेत्रातील भात पीकांना खतांची मात्रा देणे.
14) चाचणी प्रयोगाच्या कुंपणाच्या बाजुची झाडे तोडणे.
15) किटकनाषके चाचणी प्रयोगांच्या प्रक्षेत्रावर किटकनाषकांची फवारणी करणे.
16) विविध वाणांच्या चाचणी प्रयोगांची तसेच किटकनाषके चाचणी प्रयोगांची निरीक्षणे घेण्यास मदत करणे.
17) शेतकऱ्यांच्या शेतावर घेण्यात येणाऱ्या प्रयोगांची निरीक्षणे घेण्यास मदत करणे.
18) किटकनाषके चाचणी प्रयोगांच्या प्रक्षेत्रातील बेणणी करणे.
19) किटकनाषके चाचणी प्रयोगाच्या प्रक्षेत्रातील भात पीकाची कापणी करणे.
20) किटकनाषके चाचणी प्रयोगाच्या प्रक्षेत्रातील भात पीकांना कापणी केल्यानंतर झोडणी करणे व भात साफ करणे.
21) पेंढयाचे भारे बांधणे, पेंढयाचे तसेच भाताची वजने घेणे.
22) प्रयोगषाळेतील स्प्रेअर्स, डस्टर्स इ. उपकरणे स्वच्छ ठेवणे.
23) ऐनवेळी सांगण्यात येणारी सर्व कामे करणे.

**किटकशास्त्रज्ञ**
**प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,**
**कर्जत–410201 जि. रायगड**